Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March 2021

ISSUE No- (CCLXXVI ) 276 - E

# Women's Rights : Status & Goal



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
**Director**
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor:**
[illegible]
**Principal**
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

**Editor:**
Dr.Archana D.Patil
Head, Dept. of Pol. Sci,
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

This Journal is Indexed In :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To :

Aadhar Publications

DR. ... UMATHE COLLEGE NAGPUR

| | | |
|---|---|---|
| 22 | भारतीय संविधान और महिला अधिकार — प्रो. सेलीन मावी | 90 |
| 23 | महिलाओं के अधिकार – प्रकृति एवं वास्तविकता — प्रो.विजय मावी | 93 |
| 24 | कार्यशील महिलाएं एवं मानवाधिकार — डॉ.मीना मावी | 96 |
| 25 | कौटुंबिक हिंसाचार व महिलांचे संरक्षण — डॉ. लोकेश बी. नंदेश्वर | 99 |
| 26 | संविधानातील महिलाविषयक तरतुदी<br>रुपाली लक्ष्मण राठोड , डॉ .एस.जी.बुटे | 103 |
| 27 | स्त्रियांचे शोषण आणि मानवाधिकार — प्रा. डॉ. केशव सिताराम गोरे | 106 |
| 28 | महिला सक्षमीकरण : एक आर्थिक दृष्टीक्षेप — डॉ. सुधाकर सोनोने | 110 |
| 29 | ग्राम पंचायत प्रशासनातील महीलांचा सहभाग — प्रा.नरेश वा. पाटील | 114 |
| 30 | सिमॉन द बूव्हा : स्त्रीवादाची आदय प्रवर्तक — प्रा. डॉ. भगवान लोखंडे | 120 |
| 31 | ग्रामीण महिला उद्योजक आणि सक्षमीकरण — प्रा. डॉ. संजय मारोतीराव मुंडकर | 128 |
| 32 | लिंगभावाधारीत अर्थसंकल्पात भरीव तरतुद करण्याची गरज<br>प्रा. डॉ. विजय के. बन्सोड | 132 |
| 33 | कृषी उदयोगाच्या विकासातील महिलांचे योगदान<br>प्रा. डॉ. सुरेश ल. पंडित | 136 |
| 34 | महिला अधिकार सदयस्थिती आणि ध्येय — डॉ.मनीषा द. पवार | 139 |
| 35 | शारीरिक शिक्षणात महिलांचा सहभाग — प्रा. डॉ. तातेराव एकंनाथ केंद्रे | 142 |
| 36 | भारतातील स्त्रीयांच्या सामाजिक समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन<br>प्रा. अमरिष एस. गावंडे | 146 |
| 37 | कोविड–१९ स्त्रियांच्या मानसिकतेचे अध्ययन<br>प्रा. दिपाली त्र्यंबकराव देशमुख | 150 |
| 38 | भारतातील स्त्रीयांचा राजकीय सहभाग : एक चिकित्सक अध्ययन<br>डॉ.विजय कृष्णराव काळे | 153 |
| 39 | भारतीय संविधान व महिंलांचे मानवाधिकर डॉ. बाळासाहेब जी. जोगदंड | 159 |
| 40 | शिक्षणाचा मुलभूत हक्क आणि उच्च शिक्षणातील स्त्रीयांच्या समान संधी समोरील आव्हाने — डॉ. सेलूकर एस. एम. | 164 |
| 41 | भारतीय संविधान आणि महिलांचे अधिकार<br>कु. स्नेहा सोन्याबापू सोळंके. / अमित नानाभाऊ कुटे | 168 |
| 42 | महिला उद्योजकता विकास काळाची गरज — प्रा.डॉ. रीता देशमुख | 171 |
| 43 | Laws of Adoption and women's rights — Dr. Margavi S. Dongare | 175 |


DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

**B.Aadhar** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ((SJIF) -7.675, Issue NO, 276(CCLXXVI) E
ISSN : 2278-9308
March, 2021

# लिंगभावाधारीत अर्थसंकल्पात भरीव तरतुद काळाची गरज

प्रा. डॉ. विजय के. बन्सोड
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. एम.के. उमाठे कॉलेज, नागपूर २२.

**प्रास्ताविक :**

आधूनिक युगात लिंगआधारीत बजेट समाजाच्या विविध वर्गातील वाढत्या चेतनेचा प्रभाव आहे. भारतीय समाज हा विविध जाती, धर्म आणि पंथात विभागलेला आहे. या सर्वामध्ये समानतेची अपेक्षा आणि त्याला पुर्ण करण्याची चेतना निर्माण झालेली दिसून येते. भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार करता हल्ली लिंग आधारीत बजेट ही संकल्पना पूढे आलेली आहे. यातून राष्ट्र आणि राज्य यांचे प्रयत्न आहे की, सरकारी योजनेचा लाभ हा समाजातील स्त्री वर्गापर्यंत पोहचावा आणि लिंग आधारीत पुरुष आणि स्त्री यातील विषमतेची दरी दूर केली जावी.

लिंगआधारीत बजेट याचा अर्थ स्त्रीयांकरीता वेगळे बजेट निर्माण करणे नसून मूख्य बजेट मध्येच समायोजन करून सामाजीक आणि लैंगीक विशमता दूर करण्याचा प्रयत्न करणे होय. प्रायोगीक स्थरावर प्रथमतः ऑस्ट्रेलिया मध्ये सन १९८० मध्ये लिंगआधारीत बजेट प्रस्तूत करण्यात आले होते. त्यानंतर मात्र सन १९८९ मध्ये ब्रिटन मध्ये आणि सध्या जगातील ७० देशात लिंगआधारीत बजेट चा उपयोग केल्या जात आहे.सध्या भारतात बदलत्या काळाच्या अनुषंगाने कल्याणाची जागा सशक्तिकरणाने घेतलेली आहे आणि त्यामूळेच देशात ९ व्या पंचवार्षीक योजनेत ३०टक्के रक्कम लिंगआधारीत बजेटच्या रूपाने स्त्री वर्गाकरीता विविध योजनेच्या स्वरूपात वितरीत करण्यात आले होते. सन २००१ ला भारत सरकारने 'महिला सशक्तिकरण वर्ष' घोषीत करून देशात महिला विकासाला प्राधान्य देण्यात आले.

**लिंग आधारित अर्थसंकल्प म्हणजे काय?**

प्रत्येक वर्षी फेब्रवारी महिन्यात अर्थसंकल्प सादर केला जातो. या मुख्य चर्चा प्रमूखतः कोणत्या गोष्टी महाग किंवा स्वस्त झाल्यात किंवा करवाढ, करसवलत यावरच होताना दिसतात. मात्र अर्थसंकल्पात कोणत्या समुदायाला किती व कसा फायदा होणार या विषयीची चर्चा होताना दिसून येत नाही. विकासाचे फायदे समाजातील प्रत्येक वर्गाला व प्रत्येक घटकाला होणे गरजेचे आहे. समाजातील प्रत्येक वर्गाला व प्रत्येक घटकाला विकासाचे फायदे पोहचविण्यासाठी अर्थसंकल्पात तशा तरतुदी करणे व ठोस धोरणात्मक निर्णय घेणे अपेक्षीत असते. लिंग आधारित अर्थसंकल्प ही त्या दृष्टीने साकारलेली मुर्त कल्पना आहे. लिंग आधारित अर्थसंकल्प याचा अर्थ महिलांसाठी स्वतंत्र अर्थसंकल्प नसून लिंग आधारित अर्थसंकल्पात स्त्रीयांच्या गरजांकडे विशेष लक्ष देवून त्याच सर्वांगीन विकास घडवून आणने होय.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे**

१. स्त्रियांच्या आर्थीक मागासलेपनाच्या कारणांचा शोध घेणे.
२. देशात मांडल्या जानाऱ्या अर्थसंकल्पातील दोष अभ्यासणे.
३. स्त्रियांच्या आरोग्य, शिक्षण, आर्थिक स्तरात सुधारना करण्यासाठ उपाययोजना सुचविणे.

**भारतातील स्त्रियांची सद्यास्थिती :**

देशात राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना ३१ जानेवारी १९९२ ला झाली असून याने २९ वर्ष पूर्ण केलेली आहेत. या दृष्टीकोनातून विचार करता देशात सन १९९१ मध्ये ९४५ वर असलेला बाल—लिंगानुपात खाली घसरून सन २०११ मध्ये ९१४ वर आलेला आहे. सध्या



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

देशात ३२ करोड महिला प्रजनन संबंधीत रोगाने ग्रस्त आहेत. एका अंदाजा नूसार २७ कोटी महिला या 'प्रीमेंस्टुअल सिंड्रोम' या आजाराने ग्रस्त आहेत. देशातील ग्रामीण महिलांचा विचार करता ४० टक्के महिलांना ल्युकोरीया, अल्सर आणि गर्भासियाचा कैंसर या रोगाने ग्रस्त आहेत. राष्ट्रीय पोषण मॉनिटरींग ब्यूरो नूसार देशात १३ ते १५ वर्ष वयोगटातील तरूणींना १६२० उष्मांकाचे अन्न मिळत आहे जेव्हा की त्यांना २०५० उष्मांकाची आवश्यकता आहे. आमच्या देशात प्रती एक लाख जिवंत मूलाच्या बाळंतपणात ४५० मातांना आपला जीव गमवावा लागतो आहे. त्यामूळेच स्वास्थ सुविधांच्या बाबतीत भारतात महिलांचा विकास हा अजूनही अपूर्ण आणि त्याहिपेक्षा चिंताजनक झालेला आहे.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या एका अहवाला नूसार, देशातील ६१२ जिल्हयात केलेल्या एका अध्ययनानुसार हल्ली अर्ध्यापेक्षा जास्त जिल्हयात कमी वयाच्या मूली, तरूणी आणि महिलांची तस्करी केली जात आहे. सीबीआय च्या अहवालानुसार भारतात वेश्यालयात १३ लाख महिला काम करीत असून एकटया मुंबईतील कामाठीपूरम मध्ये ७० हजार महिलांचा समावेश आहे. तसेच देशात शोषण आणि बलात्काराचे प्रकरण दरवर्षी वाढतच चालेले आहेत.

देशात कृषी क्षेत्रात स्त्रियांची भूमीका स्विकारून डॉ. स्वामीनाथन यांनी राज्यसभेत 'महिला कृषी हक्कधारी विधेयक' २०११ प्रस्तूत करण्याचा प्रस्ताव मांडला होता. या प्रस्तावात महिला शेतकऱ्यांकरीता अनुकूल वातावरण निर्माण करणे, पानी, कर्ज आणि साधने मीळण्यास मदत आणि जमीनीचे पट्टे देने या प्रमूख बाबींचा यात समावेष होता. सध्या देशात ११टक्के महिलांकडेच जमीनीचे पट्टे असून यातील सर्वात जास्त सिमांत आणि लहान शेतकरी आहेत. डॉ. स्वामीनाथन यांच्या पाच सुत्री कार्यक्रमाकडे लक्ष दिल्यास यातून महिलांना काही प्रमाणात फायदा होण्याची शक्यता आहे. परंतू देशात या पाच सुत्री कार्यक्रमाची अंमलबजावणी अत्यंत हळूवारपणे होत असल्याचे दिसून येते.

देशात महिला भ्रुण हंत्या हा चिंतेचा विषय बनत चालेला आहे. सन १९८६ते२०२० या काळात देषात ४.६ कोटी स्त्री भ्रुण हंत्या करण्यात आलेली होती. याचे मूख्य कारण गरीबी सांगण्यात येत असले तरी ग्रामीण भागाच्या तूलनेत शहरी भाग हा स्त्री भ्रुण हंत्येच्या बाबतीत पुढारलेला आहे. देशात प्रत्येकवर्षी १५ लाख जन्मलेल्या मूलीपैकी, १.५ लाख मूली आपल्या पहील्या जन्मदिवसा अगोदर तर २५ टक्के मूली या आपल्या १५ व्या जन्मदिवसा अगोदर मरण पावतात.

भारतात स्त्रीयांचा साक्षरता दर पुरूषांच्या तूलनेत कमी राहीलेला आहे.एका अंदाजानुसार देशात ३५ टक्के महिला निरक्षर असून पुरूषांचे प्रमाण यात २४ ठक्के आहे. येणाऱ्या पाच वर्षात यात सुधारणा होण्याची शक्यता असली तरी देषातील सामाजीक आणि आर्थिक विषमता यात अडथळे निर्माण करीत आहे. सन २००१७. १८ च्या राष्ट्रीय नमूना सर्वेक्षणाच्या अहवाला नूसार देशात वेतनधारक महिलांची संख्या फक्त २१ टक्के असलेली दिसून येते. यातून देशातीत उरलेल्या ७९ टक्के महिलांच्या विकासाचा मार्ग अजूनही अवरूद्ध असल्याचे निदर्शनास येते.

**लिंगभावाधारित अर्थसंकल्पाची पाश्र्वभुमी:**

सन २००१ साली संयुक्त राष्ट्रसंघाच्या महिला विकास निधीने काठमांडू येथे भरलेल्या परिषदेत लिंगभावाधारित अर्थसंकल्पाची संकल्पना कशा प्रकारे विकसीत करता येइल याचा विचार करण्यात आला. याचीच परिणिती म्हणून भारतात २००५.०६ या वर्षापासून लिंगभावाधारित अर्थसंकल्पाची सुरवात झाली होती. या अर्थसंकल्पात महिलांसाठी खास तरतुदी हेतु वित्त विभागाच्या सहकार्याने अशोक लाहिरी यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांची समीती नेमण्यात आली होती. या समितीने लिंगभावाधारित अर्थसंकल्पासाठी खालील शिफारशी केल्या होत्या.



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

**अशोक लाहिरी समितीच्या शिफारशी:**

१□ महिलांसाठी सार्वजनिक खर्चामध्ये खास तरतुद करने.

२□ जेंडर बजेटिंग सेलची स्थापना करने.

३□ महिलांसाठी केलेल्या तरतुदीत पारदर्शकता आणणे.

४□ महिलाकेंद्री कार्यक्रम राबविने

५□ महिलांसाठी योजना निर्माण करने.

वरिल शिफारशींच्या अनुषंगाने २००७ सालापासून सर्व सरकारी विभाग व व केंद्र सरकारच्या सत्तावन्न खात्यांमध्ये जेंडर बजेटिंग सेलची स्थापना करण्यात आली आहे. केंद्र सरकार बरोबरच राज्य सरकार व केंद्र शासीत प्रदेशातही जेंडर बजेटिंग सेलची स्थापना करण्यात आली आहे. २०१४ पासून महिलांच्या प्रश्नांना अर्थसंकल्पाच्या नियोजनाच्या पातळीपासूनच सामावून घेण्यासाठी तसेच कार्यक्रमांची निर्मिती व अंमलबजावनी करण्यासाठी तरतुद करण्यात आली. केद्रसरकारच्या आकडेवारीनुसार सर्व विभागांनी महिला व बालविकासासाठी २००४—५ मधे १४,३७८ कोटी रूपयांची तरतुद, २०१६—१७ ९०,६२६ कोटी रूपयांची तरतुद केली होती. महाराष्ट्र राज्य सरकारने लिंगभावाधारित अर्थसंकल्पाची संकल्पना २०१३ पासून स्विकारली आहे.

**महाराष्ट्र राज्य सरकारने लिंगभावाधारित अर्थसंकल्पातील प्रगती:**

महाराष्ट्र राज्य सरकारने लिंगभावाधारित अर्थसंकल्पाची संकल्पना २०१३ पासून स्विकारली आहे. २०२०—२१ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्य सरकारने महाराष्ट्राच्या जेंडर बजेटसाठी ३०० कोटी रूपयांची तरतुद केली होती. महाराष्ट्र राज्यात सद्या मनोधैर्य योजना, माझी कन्या भाग्यश्री योजना, अंगीकृत बाविकास सेवा, बेटी बचावो बेटी पढावो योजना, बालक संगोपन संस्था, महिला सल्ला केंद्र, सावित्रीबाई फुलें बहुउद्देशीय केंद्र, बाल सल्ला केंद्र, बाल संगोपन योजना, राजीव गांधी काम करनाऱ्या महिलांच्या मुलांसाठी संगोपन केंद्र, इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना, पौगंडावस्थेतील मुलींसाठी योजना, किशोरी शक्ति योजना, कूमारी माता योजना, देवदासी कल्यान योजना, अनाथाश्रम, महिला निवारा केंद्र, शुभमंगल सामुहिक विवाह योजना सुरू आहेत.

**लिंगभावाधारित अर्थसंकल्पाचे फायदे:**

१) लिंगभावाधारित अर्थसंकल्पामुळे महिलांच्या सक्षमीकरनात वाढ झाली आहे.

२) शिक्षणातील मुलींचे गळतीचे प्रमाण घटले आहे.

३) मुलींचे उच्च शिक्षणातील प्रमाण वाढण्यास मदत झाली.

४) महिलांच्या शारीरीक व मानसीक आजारातुन मुक्ततेस सहायक झाले.

५) कार्यक्षम लोकसंख्येत महिलांचा हिस्सा वाढलेला आहे.

६) स्त्रियांच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षनिक दर्ज्यात वाढ झाली आहे.

७□ स्त्रियांसाठी आरोग्याच्या सोयी उपलब्धतेमुळे मातामृ□युदर, बालमृ□युदरयात घट झाली आहे.

८□ समाज प्रबोधन व सक्त कायदे यामुळे स्त्री भ□□□□□ □□ □□ □□□□

**समारोप**

लिंगभावाधारित अर्थसंकल्पाची गरज ओळखुन सरकारने या संकल्पनेस अमलात आणले मात्र यात केली जाणारी तरतुद ही एकून बजेटच्या दोन टक्के असून ५० टक्के असणाऱ्या महिलावर हा अन्यायच मानावा लागेल. म्हणून सरकारने लिंगभावाधारित अर्थसंकल्पासाठी किमान ३० टक्के तरतुद करणे अनिवार्य आहे. खऱ्या अर्थाने महिलांना सशक्त करायचे असेल तर, आता महिलांना सामाजीक अधिकार, शिक्षण, न्याय, स्वास्थय, प्रतिष्ठा आणि वित्तीय सुदृढता प्रदाण करण्याची गरज निर्माण झालेली आहे. महिलांना एकत्रीत करून, त्यांचे समूह तयार करून त्यांना



DR. M. K. UMATHE COLLEGE NAGPUR

तांत्रीक, संगठनात्मक आणि वाणिज्यीक क्षमता आणि सामर्थ्यात सुधारणा करण्याकरीता नविन कार्यक्रम तयार करणे गरजेचे झाले आहे. यासाठी भरीव अशी तरतुद असलेल्या लिंगभावाधारित अर्थसंकल्पाची गरज असून खरोखरच महिलांना सामाजीक अधिकार, शिक्षण, न्याय, स्वास्थय, प्रतिष्ठा आणि वित्तीय सुदृढता प्रदाण करायची झाल्यास वाटप निधीचे हस्तांतरन व खर्चाची योग्य अंमलबजावनी झाल्यास भारतीय महिलांच्या दुर्दशेत घट झाल्याशिवाय राहनार नाही.

संदर्भ ग्रंथ –

१) योजना ;२०१२ – 'बजेट २०१२.१३' ५३८ योजना भवन, संसद मार्ग, नयी दिल्ली. अप्रैल
२) योजना ;२०१२ – 'स्त्री सशक्तीकरण' ५३८ योजना भवन, संसद मार्ग, नयी दिल्ली. जून
३) कुरूक्षेत्र ;२०१९ – 'ग्रामीण महिला सशक्तिकरण' ६५५ निर्माण भवन, ग्रामीण विकास मंत्रालय, नयी दिल्ली. सितंबर.
४) आपटे ज. रा., रोडे पुष्पा, भारतातील महिला विकासाची वाटचाल, डायमंड पब्लिकेशन पुणे.

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

# DR. HARIBHAU ADMANE ARTS & COMMERCE COLLEGE SAONER DIST-NAGPUR

DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE

AND

AADHAR SOCIAL RESEARCH & DEVELOPMENT TRAINING INSTITUTE, AMRAVATI

INTERNATIONAL WOMEN'S DAY

8 MARCH

## WORLD WOMEN'S DAY

8th MARCH 2021



Impact Factor – 7.675

ISSN-2278-9308

# Certificate

*This is to certify that Prof./Dr./ Mr./Mrs./Ms.* प्रा. डॉ. विजय के. बन्सोड

*of* सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. एम.के. उमाठे कॉलेज, नागपूर २२

*has published a paper on* लिंगभावाधारीत अर्थसंकल्पात भरीव तरतुद काळाची गरज

*in Peer Reviewed International Indexed Research Journal Special Issue on* "Women's Rights : Status & Goal" *published on Dated 8th March 2021.*

Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social Research &
Development Training Institute, Amravati

Dr.Archana D.Patil
Coordinator
HOD, Dept.of Political Science
Dr. Haribhau Admane College Saoner

PRINCIPAL
Dr. M. K. Umathe College
Nagpur - 440022

Dr.Virendra K.Jumde
Principal
Dr. Haribhau Admane College Saoner